Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-IV APR. 2017

Address
· Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
· Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
· (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
· aiirjpramod@gmail.com
· aayushijournal@gmail.com

Website
· www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# मिरजगावचा स्थानिक इतिहास

तानाजी जाधव
इतिहास विभाग प्रमुख
महात्मा फुले नूतन महाविद्यालय, मिरजगाव

**सारांश –**

*इतिहासाचे पुनर्लेखन करीत असताना स्थानिक व गावच्या इतिहासातील संदर्भ शोधण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मिरजगाव ता. कर्जत, जि. अहमदनगर येथील स्थानिक इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला आहे. स्थानिक इतिहास लेखनामध्ये संदर्भ साधनांची उपलब्धता ही महत्वाची समस्या आहे. त्यामुळे मुलाखतीच्या माध्यमातून माहिती गोळा करावी लागते. मात्र मुलाखतीच्या माध्यमातून मिळणाऱ्या माहितीची विश्वासार्हता ठरविणे हे फार मोठे आव्हान असते. अशा अनेक समस्या असल्या तरी इतिहासाच्या पुनर्लेखन प्रक्रियेत स्थानिक इतिहासास आनन्यसाधारण महत्व आहे. स्थानिक इतिहासाची तत्वे जुळवत असताना राष्ट्रीय व प्रादेशिक इतिहासाचे स्थानिक इतिहासाशी जोडलेले दुवे शोधता येतात. प्रादेशिक स्तरावरील चळवळी व राष्ट्रीय लढयातील पडसाद स्थानिक इतिहासात पडल्याचे दिसते. विविध लढे व चळवळी यांच्याबाबत स्थानिकांचे आकलन समजावून घेता येते. एकुणच गावचा किंवा स्थानिक इतिहास लेखन हा इतिहासाच्या पुनर्लेखनासाठीचा महत्वाचा टप्पा आहे.*

**प्रस्तावना –**

मिरजगाव हे अहमदनगर जिल्हयातील कर्जत तालुक्यामध्ये वसलेले महत्वपुर्ण गाव आहे. पेशवे काळातील जाहगीरीचे गाव म्हणून ओळख असलेले हे गाव परिसरातील महत्वाची बाजारपेठ म्हणून प्रसिध्द आहे. शैक्षणिक दृष्टया व व्यापारी दृष्टया या गावाला महत्व आहे.

- **भौगोलीक स्थान –**

मिरजगाव हे गाव उत्तर व दक्षिण भारताला जोडणाऱ्या अहमदनगर सोलापूर महामार्गावर (महामार्ग क्र. 141) अहमदनगर पासून आग्नेयेस 52 कि. मी. अंतरावर वसलेले आहे. तर मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा राज्य मार्ग क्र. 68 मिरजगाव मधून जातो. त्यामुळे दळणवळणाच्या दृष्टीने या गावाला महत्व आहे. आजूबाजूच्या अनेक खेडयांची व सोलापूर बीड जिल्हयातील काही गावांची बाजारपेठ म्हणून 18 व्या शतकापासुन या गावची ओळख आहे.

मिरजगावचे सरासरी तापमान उष्ण व कोरडे असून उन्हाळयामध्ये ते 42 ते 44 अंश सेल्सीअस तर हिवाळयामध्ये 7 त 8 अंश सेल्सीअस असते. या भागात पावसाचे प्रमाण कमी असून हे गाव दुष्काळी पट्टयामध्ये येते. गावच्या पुर्वेकडून 2 कि.मी. अंतरावरून सिना नदी वाहते. नदीच्या पुर्वेकडे मराठवाडा तर पश्चिमेकडे पश्चिम महाराष्ट्राचा प्रदेश येतो. 2011 च्या जनगणनेनुसार गावची लोकसंख्या 11934 असुन त्यामध्ये 6088 पुरूष व 5846 स्त्रिया आहेत. गावचे क्षेत्रफळ 3400 हेक्टर येवढे असून त्यामध्ये 76.5 टक्के शेतीखाली 9.8 टक्के जंगलाखाली 13.60 टक्के गाव व इतर जमीन आहे.

- **गावच्या नावाचा इतिहास –**

मिर्झा पठाण नावाच्या निजामाच्या सरदाराने या प्रदेशावर आक्रमण केले त्यावेळी मराठयांशी त्याचा या ठिकाणी संघर्ष झाला. त्यामध्ये मिर्झा पठाण मारला गेला त्यामुळे या गावाला मिर्झागाव असे नाव पडले व पुढे त्यालाच मिरजगाव असे म्हटले जावू लागले. अशी आख्यायिका सांगितली जाते.

दुसरे म्हणजे महानुभाव पंथातील साहित्यानुसार महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी भ्रमंती करत असताना दोन दिवस या गावामध्ये वास्तव्यास होते. येथील तीर्थाच्या मळयामध्ये त्यांचा मुक्काम होता. त्याठिकाणी महानुभाव पंथाचा आश्रम व मंदिर आहे. महानुभाव पंथाच्या साहित्यामध्ये या गावचा उल्लेख मिरडागाव असा केलेला आहे. त्याचेच रूपांतर पुढे मिरजगाव असे झालेले असावे.

- **ऐतिहासीक पार्श्वभूमी**

या गावाला ऐतिहासीक पार्श्वभूमी लाभलेली आहे. पेशवे काळात सीना नदीच्या पुर्वेकडे निजामसत्ता होती. व पश्चिमेकडे मराठयांचे साम्राज्य होते. त्यामुळे मराठयांच्या साम्राज्यातील निजाम सिमेवरील महत्वाचे मोठे व जहागीरीचे गाव म्हणून मिरजगावला महत्व होते. आजही गावामध्ये 500 वर्षापुर्वी बांधलेले अनेक जुने वाडे भग्न अवस्थेत पहावयास मिळतात. गावच्या पश्चिमेस एक वेस असून तिला दोन्ही बाजूस मोठे टेहळणी बुरूज पडझड आवस्थेत दिसून येतात. गावच्या दक्षिणेस काळामारूती मंदिरासमोर एक वेस दिसून येते.

- **मिरजगावची जहागीर व पाटीलकी –**

मध्ययुगीन काळात सरदारांना लष्करी पथके संभाळण्याच्या खर्चासाठी विशिष्ट गावे जहागीरीच्या स्वरूपात दिली जात होती. त्यानुसार पेशवेकाळात मिरजगाव हे गाव मोकासा (जहागीर) दिले होते. सावंत घराण्याकडे ही जहागीरी होती. तर ब्रिटीशपुर्व काळात गावची पाटीलकी कुलकर्णी (ब्राम्हण) घराण्याकडे होती.

- **गढीचा वाडा –**

गावामध्ये सावंत जहागीरदारांची गढी (वाडा) होती. तिचे अस्तित्व आज राहिलेले नाही. पडझड झालेल्या गढीची जागा सावंतांनी 1972 च्या दरम्यान रूरल एज्युकेशन सोसायटीस बक्षीसपत्र करून दिली या जागेमध्ये आज रूरल एज्युकेशन सोसायटीचे नूतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय उभे आहे. जहागीरदारांच्या या गढीला चार बुरूज व दोन दरवाजे होते. एक दरवाजा पुर्वेकडील बाजूस होता त्याला चानखानबाबाचा दरवाजा असे म्हणत. या दरवाजाशेजारी पीर साहेब दर्गा (हजरत सय्यद सुलेमान बादशहा) आहे. व जवळच मस्जिद आहे. तर उत्तरेकडे एक दरवाजा होता. त्याला देवडी दरवाजा असे म्हणत. गढीमध्ये एक तोफ सापडली होती. ती अहमदनगर येथील वस्तू संग्रहालयामध्ये ठेवण्यात आली आहे.

- **1795 ची खडर्याची लढाई व मिरजगाव –**

1795 ची खडर्याची लढाई मराठयांच्या इतिहासामध्ये प्रसिध्द आहे. मराठयांचा अखेरचा विजय म्हणून या लढाईकडे पाहीले जाते, कारण त्यानंतर कोणत्याही लढाईत मराठयांना विजय मिळाला नाही शेवटी 1818 मध्ये इंग्रजांनी मराठी सत्तेचा अस्त केला 1795 मध्ये निजामानी मराठी प्रोशावर आक्रमण केले उत्तरेकडून मराठी फौजा आल्यानंतर खर्डा या ठिकाणी मराठा – निजाम सैन्याची गाठ पडली या लढाईत मिरजगावचे सावंत जहागीरदार सैन्यासह सहभागी झाले होते. यामध्ये मिरजगावचे काही सैन्य मारले गेले होते. ही लढाई चालू असताना निजामाचे काही घोडेस्वार मिरजगावला आले, त्यांनी गढीच्या वाडयावर हल्ला केला, गढीवरील सैन्य खडर्याच्या लढाईत सहभागी झाले होते, त्यामुळे गढीमध्ये फक्त स्त्रिया होत्या. त्यावेळी गढीवरील स्त्रियांनी बुरूजावरून उडया टाकून आपली अब्रु वाचविली हा दुर्देवी प्रकार घडला. त्यानंतर जहागीरदारांना गढीमध्ये राहण्याची इच्छा राहिली नाही. त्यामुळे त्यांनी 1804 मध्ये गढी शेजारीच नवीन वाडा बांधला. आज या वाडयामध्ये स्वामी समर्थांचे मंदिर आहे.

- **फुटाण्याचे मिरजगाव –**

1875 मध्ये मिरजगावमध्ये मोठा दुष्काळ पडला होता. लोकांना प्यायला पाणी नव्हते. सर्व आड व बारव कोरडे पडले होते. जनावरांना चारा राहिला नव्हता. खायला अन्नधान्य मिळेनासे झाले होते, त्यामुळे लोकांची उपासमार सुरू झाली होती. अशा दयनीय अवस्थेत व्यापारी दुनी–तीनीने लोकांना धान्य देत होते. गावातील सावंत जहागीरदारांकडे बळदात 150 पोती हरभरा होता. अशा कठीण प्रसंगी जहागीरदारांनी लोकांना हरभाऱ्याचे वाटप केले. गावातील लोकांनी फुटाण्यावर तो दुष्काळ परतवला. तेंव्हा पासुन मिरजगावची फुटाण्याचे मिरजगाव अशी ओळख आहे. आजही गावामध्ये फुटाण्याच्या भट्टया आहेत. आठवडी बाजारातून फुटाणे घेतल्याशिवाय बाजारकरी परत जात नाही.

- **राष्ट्रीय नेत्यांच्या भेटी –**

देशाच्या स्वातंत्र्य लढयामध्ये या गावातून काही स्वातंत्र्य सेनानी या लढयामध्ये उतरले होते. 1942 –43 मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी गावामध्ये आले होते. त्यांनी गावात सभा घेतली. ज्याठिकाणी गांधीजींची सभा झाली ते मैदान गांधी मैदान या नावाने ओळखले जाते. 1936 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या गावाला भेट दिली होती. ब्रिटीश सरकारच्या विरोधात प्रतीसरकारची स्थापना करणारे व ज्यांनी भूमिगत राहून ब्रिटीश सत्तेशी झुंज दिली अशा क्रांतीसिंह नाना पाटलांनी 1945–46 मध्ये मिरजगावला भेट देवून सभा घेतली. स्वातंत्र्या नंतर भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू 1952 मध्ये मिरजगावला आले होते. येथील गुरवपिंप्री पाझर तलावाचे भुमीपुजन त्यांच्या हस्ते झाले.

- **मिरजगाव ग्रामपंचायत मिरजगाव –**

स्वातंत्र्यपूर्व काळात 1922 मध्ये मिरजगाव ग्रामपंचायतीची स्थापना झाली. श्री. विष्णूपंत कलवडे हे गावचे पहिले सरपंच होते. मिरजगाव ग्रामपंचायत ही 17 सदस्य असलेली मोठी ग्रामपंचायत असून ग्रामपंचायतीने अनेक विधायक कामे करून गावच्या विकासात भर टाकली आहे. गटारी व दिवाबत्ती बरोबरच ग्रामसचीवालय व व्यापारी गाळे ग्रामपंचायतीच्या वतीने बांधण्यात आले आहेत. 1991 – 92 मध्ये तत्कालीन सरपंच मा. डॉ. अे. बी. चेडे यांनी गायरान जमीनीमध्ये वृक्ष लागवड कार्यक्रम राबविला या विधायक कार्याची महाराष्ट्र शासनाने दखल घेवून सरपंच डॉ. अे. बी. चेडे यांना वनश्री पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. या बरोबरच डॉ. अे.बी. चेडे यांच्या प्रयत्नातून ग्रामपंचायतीने निमगाव गांगर्डा येथील सीना धरणातून 24 कि.मी. लांब पाणीपुरवठा योजना राबविली, त्यामुळे मिरजगावच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटलेला आहे.

या शिवाय महाराष्ट्र शासनाच्या यशवंत पंचायतराज अभियानामध्ये सन 2012 चा द्वितीय क्रमांक व 2013 चा तृतीय क्रमांक ग्रामपंचायतीस मिळाला आहे. तर केंद्र सरकारने राबविलेला पंचायत सशक्तीकरण पुरस्कार ग्रामपंचायतीस मिळाला आहे. याशिवाय मिरजगाव ग्रामपंचायतीच्या वतीने शौचालयासाठी अनुदान वाटप, शाळेतील मुलांना गणवेश वाटप एक किंवा दोन मुलींवर शस्त्रक्रिया केलेल्या पालकांचा सत्कार व अशा 20 मुलींच्या नावावर ग्रामपंचायतीच्या वतीने रूपये 10000 ठेव बॅकेमध्ये करण्यात आले आहे. असे अनेक विधायक कार्यक्रम ग्रामपंचायतीच्या वतीने राबविले जातात.

- **मिरजगावचा सिटी सर्व्हे –**

1940 मध्ये कृष्णराव सावंत सरपंच असताना मिरजगाव ग्रामपंचायतीने सिटी सर्व्हे केला. त्यावेळी सिटी सर्व्हे झालेले मिरजगाव हे अहमदनगर जिल्हयातील पहिले व एकमेव गाव होते. त्यावेळी सिटी सर्व्हे मध्ये गावातील ज्या जागेचे कोणी मालक नव्हते त्या जागा कृष्णराव सावंत यांनी आपल्या नावावर केल्या. पुढे 1961 – 62 मध्ये त्या जागेवर सरकार अशी नोंद लागली. या विरूध्द कृष्णराव सावंत कोर्टामध्ये गेले. 1965 पर्यंत जिल्हा न्यायालयात हा खटला महाराष्ट्र शासन विरूध्द कृष्णराव

सावंत असा चालला. व निकाल कृष्णराव सावंतांच्या बाजूने लागला मात्र शासनाने उच्च न्यायालयामध्ये अपील केले. पुढे 1980 मध्ये मुंबई उच्च न्यायालयानेही कृष्णराव सावंतांच्या बाजूने निकाल दिला.

- **शैक्षणिक विकास –**

मिरजगावमध्ये 1862 मध्ये पहिली प्राथमिक शाळा सुरू करण्यात आली होती. पुढे ही शाळा जिल्हा लोकल बोर्डाकडे व आज जिल्हा परिषदेमार्फत चालविली जाते. गावामध्ये माध्यमिक शिक्षणाची सोय नव्हती तेंव्हा गावातील कृष्णराव सावंत, ॲड. राजाराम झरकर, ॲड. माणिकराव पाटिल, सिमरतमल भंडारी, गोकुळदास बोरा इत्यादिंनी मिरजगाव शिक्षण प्रसारक मंडळी हि संस्था काढून भारत हायस्कुल सुरू केले. पुढे ही शाळा अहमदनगर येथील हिंद सेवा मंडळाकडे सोपविण्यात आली. त्यानंतर डॉ. अे. बी. चेडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी 1972 मध्ये रूरल एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली व या संस्थेच्या वतीने इंग्लीश मिडीयम स्कुल सुरू करण्यात आले. पुढे या संस्थेने 1982 मध्ये नूतन माध्यमिक विद्यालय, 1985 मध्ये उच्च माध्यमिक विद्यालय व 2001 मध्ये महात्मा फुले नूतन महाविद्यालय सुरू केले. व गावामध्ये उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध केली. इ.स. 2000 नंतर गावचा शैक्षणिक विकास झपाटयाने होवून गावामध्ये कृषी महाविद्यालय, इंग्लीश मिडीयम स्कुल, आश्रमशाळा इत्यादि शैक्षणिक संकुले अस्तित्वात आली आहेत.

**धर्मस्थळे व उत्सव –**

- **भैरोबा मंदिर –**

मिरजगावामध्ये भैरोबाचे जुने मंदिर आहे. गावचे कुलदैवत म्हणून भैरवनाथाकडे पाहिले जाते. सर्व गाव भैरवनाथाला पालक मानते त्यामुळे गावामध्ये आजही कोणीही पालकाची भाजी खात नाहीत. गावाने श्रध्देने जोपासलेली ही परंपरा आहे. या मंदिराची देखभाल गावातील लाढाणे घराण्याकडे आहे. चैत्र महिन्यामध्ये कृष्ण नवमीला भैरवनाथाची यात्रा भरते त्या दिवशी भैरवनाथाच्या पालखीची मिरवणुक काढली जाते व दुसऱ्या दिवशी कुस्त्यांचा आखाडा भरविला जातो.

- **काळा मारूती मंदिर –**

गावच्या दक्षिणेस वेशी बाहेर उत्तरमुखी शनीचे मंदिर आहे. जागृत देवस्थान म्हणून या मंदिराकडे पाहिले जाते.

- **राम मंदिर –**

विष्णुपंत कलवडे यांच्या वाडयात खाजगी मालकीचे राम मंदिर आहे. रामनवमीला मंदिरामध्ये खाजगी स्वरूपात रामजन्मउत्सव साजरा केला जात असे. मात्र 1896 पासुन सावंत जहागीरदारांच्या पुढाकाराने रामनवमीचा उत्सव सार्वजनीक स्वरूपात साजरा केला जावू लागला.

- **गणेश उत्सव –**

मिरजगाव मध्ये गणेशउत्सव साजरा करण्याची फार जुनी परंपरा आहे. एकोणीसाव्या शतकात गावात दोन तीन खाजगी गणेश मंदिरे अस्तित्वात होती व खाजगी स्वरूपात गणेशउत्सव साजरा केला जात होता. 1820 मध्ये येथील जहागीरदारांनी सार्वजनीक स्वरूपात गणेशउत्सव साजरा करण्याची परवानगी कलेक्टर कडून घेतली होती.

- **उरूस –**

मिरजगाव मध्ये हजरत सय्यद सुलेमान बादशहा यांचा पीर दर्गा आहे. या ठिकाणी दर्ग्याचा उत्सव साजरा केला जातो. एकोणीसाव्या शतका पासुन हा उत्सव सार्वजनीक स्वरूपात साजरा केला

जात आहे. या मध्ये हिंदू मुस्लीम समाजाचे लोक एकत्र सहभागी होतात. त्यातून धार्मिक व सामाजिक सलोखा निर्माण होतो.

- **इलाजीबुबा –**

व्यापारीदृष्टया व आर्थिक दृष्टया महत्व असलेल्या या गावचा आर्थिक विकास व्हावा गावाला व्यावसायिक गती मिळावी या बरोबरच गावामध्ये एकीची भावना निर्माण व्हावी व त्याचे प्रतिकात्मक रूप असावे म्हणून 1862 – 63 दरम्यान गावामध्ये व्यापारी पेठेत शिराळाशेठ किंवा ऐश्वर्याचे व समृध्दीचे व सांस्कृतीक एकात्मतेचे प्रतिक म्हणून इलाजी बुवाची स्थापना करण्यात आली. त्या काळी दर बुधवारी इलाजीबुवाच्या मुर्तीला हार घालून संध्याकाळी आरती केली जात असे. त्याचा परिणाम म्हणून गावात व्यापार उदीम वाढला अशी व्यापाऱ्यांची भावना होती.

**संदर्भ साधने**

1. दुर्वांकुर, मधुश्री प्रकाशन पुणे – वि. कृ. सावंत
2. मुदगल गुरूजी यांची मुलाखत
3. बाळासाहेब वीर यांची मुलाखत